(मनाई आदेश)

जा.क्र./पोआ/४०७७ /२०२०
पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,
यांचे कार्यालय,दिनांक :- १३.०७.२०२०

**विषय :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३)प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश ..**

१/- ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणु (कोविड -१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३.०३.२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे तसेच मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी दिनांक १३.०३.२०२० रोजीचे आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना केली आहे. तसेच कोरोना विषाणुंचा प्रसार रोखण्यासाठीच्या उपाययोजना अंतर्गत महाराष्ट्र शासनाने संदर्भ नं. डीएमयु/२०२०/ सीआर.९२/ डीआयएसएम-०१ दिनांक २९.०६.२०२० अन्वये लॉकडाऊनचा कालावधी दिनांक ३१.०७.२०२० अखेर वाढविला आहे आणि या कार्यालयाकडील जा.क्रं./पोआ/३८८५/२०२०,३८९१/२०२०, दिनांक ३०.०६.२०२० अन्वये दिनांक ०१.०७.२०२० चे ००.०१ ते दिनाक ३१.०७.२०२० चे २४.०० वा.पर्यत संचारबंदी, जमावबंदी व वाहतुक मनाई आदेश लागु आहेत. पिंपरी चिंचवड शहरात जनतेच्या मागण्यांसाठी विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना या मोर्चे, धरणे, निदर्शने, बंद पुकारणे व उपोषणासारखे आंदोलनाचे आयोजन करतात. दिनांक १८.०७.२०२० रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मृती दिन, दिनांक १९.०७.२०२० रोजी संत सावतामाळी पुण्यतिथी, दिनांक २०.०७.२०२० रोजी दिपपुजा (गटारी आमवस्या), दिनांक २१.०७.२०२० मंगल गौरी पुजन, दिनांक २३.०७.२०२० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जंयती तसेच दिनांक २५.०७.२०२० रोजी नागपंचमी असे सण, जंयती साजरे करण्यात येणार आहेत. या कालावधीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये. याकरीता पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीकोनातून महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) चे अंमल जारी करणे आवश्यक आहे.

२/- आणि ज्याअर्थी, माझी खात्री झाली आहे की, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश करणेस पुरेसे व सबळ कारण आहे.

३/- त्याअर्थी, **मी संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** वर नमूद अ.नं.२ च्या आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात **दिनांक १४.०७.२०२० रोजी ००.०१ वा.पासून ते दिनांक २७.०७.२०२० रोजी २४.०० वा.**पर्यंत या १४ दिवसांसाठी खालील नमूद केलेली कृत्ये करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.

**अ)** कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ बरोबर नेणे.
**ब)** दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे, सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने तसेच काचेचे तुकडे व काचेच्या रिकाम्या बाटल्या बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे.
**क)** शस्त्रे, सोटे, भाले, चाकु,सुरा,कोयता, तलवारी, दंड, काठया, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे.
**ड)** कोणत्याही इसमाचे चित्राचे,प्रतिकात्मक प्रेताचे,पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे.
**इ)** मोठ-मोठयाने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे.
**फ)** यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपुर्ण भाषणे करणे किंवा आविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करून त्याचा जनतेत प्रसार करणे या कृत्यावर बंदी घालीत आहे.

Scanned with CamScanner

ग) ज्यायोगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पद्धतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) विरूध्द वर्तन करणे.

४/- महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ चे पोटकलम (३) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणेस किंवा मिरवणुक काढणेस बंदी घालीत आहे.

५/- जमावबंदीचे आदेश हे लग्नकार्य, धार्मिकविधी, प्रेतयात्रा, सिनेमागृह इत्यादी कारणांकरीता लागू राहणार नाही.

६/- वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे त्यांना लागू होणार नाही.

७/- सदरचे आदेशाची जाहिररीत्या ठळक प्रसिध्दी करावी.

८/- या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक १३ .०७.२०२० रोजी दिलेला आहे.

ठिकाण :- पिंपरी चिंचवड.
दिनांक :- १३ ०७.२०२०

पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड

प्रत,

१. सर्व पोलीस उप-आयुक्त/सहाय्यक पोलीस आयुक्त/वरिष्ठ पोलीस अभियोक्ता,पिंपरी चिंचवड
२. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, पुणे-१ यांचेकडे आवश्यक त्या प्रसिध्दीसाठी
३. व्यवस्थापक, येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे-६ यांचेकडे राजपत्रात प्रसिध्दी देणेसाठी
४. सहायक पोलीस आयुक्त; प्रशासन, पिंपरी चिंचवड पोलीस नोटीस प्रसिद्धी देणेसाठी.

प्रत कार्यवाहीस्तव :-

सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे./ शाखा, पिपरी चिचवड आयुक्तालय

2/- सर्व पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पिंपरी चिंचवड यांनी सदर आदेशाच्या प्रती महत्त्वाच्या ठिकाणी, सार्वजनिक जागी चिकटवाव्यात तसेच ध्वनिक्षेपकाव्दारे किंवा अन्य मार्गाने प्रक्षेपित करून योग्य ती प्रसिध्दी करावी व त्याबाबत योग्य त्या नोंदी अभिलेखावर ठेवाव्यात.

प्रत सविनय सादर,

१. मा.अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. मा.पोलीस आयुक्त , पिंपरी चिंचवड.
४. मा.आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.

प्रत सस्नेह अग्रेषित,

१. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग.
२. मा.आयुक्त, पिंपरी-चिंचवड, म.न.पा., पुणे.
३. मा.जिल्हा सत्र न्यायाधिश, पुणे.
४. मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, पुणे.

Scanned with CamScanner